प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ७७ मध्ये जानकीपाडा येथे वालीव पोलिस चौकी ते पाण्याची टाकीपर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे या कामास मा. प्रशासकीय ठराव क्र. ५४०, दि. ०५/०३/२०२१ अन्वये मा. स्थायी समिती सभेने प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली होती. जा.क्र. वविशम/बांध/४६८/२१, दि. १६/०३/२०२१ रोजी निविदा प्रसिध्दी करून प्राप्त निविदा धारकांपैकी लघुत्तम निविदाधारक मे. साई कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस मा.आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र. ३३६ दि. ०१/०६/२०२२ अन्वये संविदा मंजुरी देण्यात आली होती. त्यानुसार ठेकेदार मे. साई कंन्स्ट्रक्शन यांना जा.क्र. वविशम/बांध/११९३/२०२२, दि. १०/११/२०२२ रोजीने कार्यादेश देण्यात आला होता. सदर कार्यादेशाप्रमाणे ठेकेदारास कामाची रूपरेखा देण्यात आली होती. त्यानुसार ठेकेदाराने कामास सुरुवात केली होती. परंतु जागेच्या अडचणीमुळे काम सुरू होऊ शकले नाही. तदनंतर जा.क्र. वविशम/बांध/७३१/२०२३, दि. ०७/०७/२०२३ रोजीने मुदतवाढ आदेश देण्यात आला होता. परंतु सदर कामाच्या ठिकाणी काम करण्यास जागा मालकाने विरोध केल्याने सदरचे काम बंद करण्यात आले होते.

सदर कामातील अडथळा दूर करण्यासाठी मा. नगरसेवक व स्थानिक लोक प्रतिनिधी मार्फत जागा मालकाबरोबर चर्चा करण्यात आली. परंतु सदर ठिकाणी काम करण्यास जागा मालकाने परवानगी दिलेली नसल्याने सदर ठिकाणी काम करणे शक्य होत नाही. सदर कामी मे. साई कंन्स्ट्रक्शन यांनी सदरचे काम रद्द करून महानगरपालिका फंडात जमा असलेली इसारा रक्कम, अतिरीक्त सुरक्षा अनामत रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम परत मिळणे कामी दि. ०६/०६/२०२५ रोजीने अर्ज केलेला आहे. सदर रक्कमेचा तपशिल खालील तक्त्यात नमुद केलेला आहे.

अ.क्र.	तपशिल	रक्कम	नोंद
१	१% इसारा रक्कम	४३,४०४/-	ऑनलाईन
२	अतिरीक्त सुरक्षा अनामत रक्कम	२,६०,५००/-	पावती क्र. ३९९१, दि.१४/११/२०२१
३	२% सुरक्षा अनामत रक्कम	७३,८००/-	पावती क्र. ३९८५८, दि.१४/०६/२०२२
	एकूण	**३,७७,७०४/-**	

९

तरी सदरचे काम रद्द करून ठेकेदार मे. साई कंन्स्ट्रक्शन यांची वर नमुद केलेली इसारा रक्कम, अतिरीक्त सुरक्षा अनामत व सुरक्षा अनामत रक्कम अशी एकूण रु. ३,७७,७०४/- रक्कम परत मिळणेस मान्यतेस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.७७ मध्ये जानकीपाडा येथे वालीव पोलिस चौकी ते पाण्याची टाकीपर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे हे काम रद्द करून ठेकेदार मे. साई कंन्स्ट्रक्शन यांची महानगरपालिका फंडात जमा असलेली इसारा रक्कम, अतिरीक्त सुरक्षा अनामत रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम अशी एकूण रु. ३,७७,७०४/- रक्कम परत करणेकामी मंजुरी देत आहे.

मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पश्चिम, जि. पालघर, पिन नं.४०१३०३
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र.१६९६ विभाग : बांधकाम
दिनांक : ०९/१२/२०२५

प्रस्तावाचा विषय: वसई-विरार शहर महानगरपालिका **प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील दत्तानी मॉल ते वसई गांव पर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे** याकामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करणेस तसेच प्राप्त कमी दराच्या निविदा रक्कमेस सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे बाबत.

ई-निविदा क्र.	:	२०२५_VVCMC_१२३७१८९_२
लेखाशिर्ष	:	रस्ता बांधकाम
योजनेचे नांव	:	म.न.पा. योजना
अंदाजपत्रकीय रक्कम	:	रु. ४,१२,०४,५२१/-
तांत्रिक मान्यता रक्कम	:	रु. ४,१२,०४,५२१/-
निविदा रक्कम	:	रु. ४,१२,०४,५२१/-
प्रशासकीय मान्यता आदेश/ ठराव क्र.	:	मा. आयुक्त तथा प्रशासक ठराव क्र. १३०३ दि. ०१/१०/२०२५
प्रशासकीय मान्यतेची रक्कम	:	रु. ४,१२,०४,५२१/-
सुधारीत प्रशासकीय वित्तीय मान्यता रक्कम	:	रु. ३,९५,७३,७९९/- (- ३.९९% कमी दराने)
तांत्रिक मान्यता क्र. व दिनांक	:	प्र. शहर अभियंता पृ.क्र. ८ अ. क्र. ५२ दि. ०१/१०/२०२५
ई-निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक	:	दि. ०२/१०/२०२५
वृत्तपत्र निविदा प्रसिध्दी दिनांक	:	दि. ०२/१०/२०२५
वृत्तपत्रांची नांवे	:	१) दै. लोकमत २) दै. नवराष्ट्र ३) जागल्या ४) दै. प्रात:काल ५) दै. हमारा महानगर ६) दै. फ्रि प्रेस जर्नल
ई निविदा प्रसिध्दी	:	दि. ०३/१०/२०२५ दु.३.०० पासुन ते दि. १०/१०/२०२५ दु.३.०१ पर्यत
ई-निविदा अंतिम (मुदतवाढ) दि.	:	दि. १३/१०/२०२५ दु. ३.०० वाजेपर्यंत
ई निविदाद्वारे विहीत मुदतीत प्राप्त निविदा संख्या	:	०२
प्रथम फेर निविदा प्रसिध्दी दि.	:	दि. ३१/१०/२०२५ दु.११.०० पासुन ते दि. ०७/११/२०२५ दु.११.०५ पर्यत
वृत्तपत्रांची नांवे	:	१) दै. लोकमत २) दै. नवराष्ट्र ३) जागल्या ४) दै. प्रात:काल ५) दै. हमारा महानगर ६) दै. इंडियन एक्सप्रेस ७)दै. फ्रि प्रेस जर्नल
प्रथम लिफाफा उघडल्याची दिनांक	:	दि. १०/११/२०२५
ई निविदाद्वारे विहीत मुदतीत प्राप्त निविदा संख्या	:	०३
प्रापत निविदा उघडणारे अधिकारी (ज्यांच्या डीएससी ने निविदा उघडल्या त्यांची नावे नमुद करावी	:	प्र. शहर अभियंता
द्वितीय लिफाफा उघडल्याची दिनांक	:	दि. १९/११/२०२५

९

प्राप्त दर

अ. क्र.	निविदाकार	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल	एल१, एल२, एल३ इत्यादी नुसार क्रम निश्चित करुन नोंदवावा	एल१ चा तपशिल
१	मे. राठोड भाग्यजीत ॲण्ड कं.	(-) ३.९९% कमी दराने (रु. ३,९५,७३,७९९/-)	कॅनरा बँक धनादेश क्र. ४८४७७८ दि. २०/११/२०२५ पा.क्र. २०२४२८ दि. २०/११/२०२५	एल१	
२	मे. साई गणेश एंटरप्रायजेस	(-) १.२५% कमी दराने	-	एल२	

उपरोक्त निविदाकार यांनी सादर केलेल्या दराचा विचार करता सर्वात कमी दर **मे. राठोड भाग्यजीत ॲण्ड कं.** हे निविदाधारक ठरत असून त्यांनी अंदाजपत्रकापेक्षा **(-)३.९९% कमी दराने** (रक्कम रु. ३,९५,७३,७९९/-) दर नमुद केलेले आहेत. तरी संबंधितास मा. निविदा समितीने **दि. ०५/११/२०२५** रोजी सदर दरास मंजूरीची शिफारस दिली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(अ) अन्वये संविदा करणेस मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडे मंजूरी करीता सविनय सादर.

निर्णय:- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील **प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील दत्तानी मॉल ते वसई गांव पर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे** कामी प्राप्त निविदांपैकी **मे. राठोड भाग्यजीत ॲण्ड कं.** यांच्या निविदेतील अंदाजपत्रकापेक्षा **(-)३.९९% कमी दराने** रक्कम रु. ३,९५,७३,७९९/- इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करणेत येत आहे तसेच सदर निविदाही सकारात्मक दृष्ट्या कमी व योग्य आहे. या ठरावान्वये मा. आयुक्त तथा प्रशासक हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(अ) अन्वये संविदा करणेस तसेच त्याअनुषंगाने होणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

9/12

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पश्चिम), ता. वसई, जि. पालघर, पिन नं. ४०१३०३.
दुरध्वनी :- ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स :- ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १९९०

विभाग:- घनकचरा व्यवस्थापन
दिनांक:- ०९ / १२ /२०२५

प्रस्तावाचा विषय :- नागरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन व क्षेपणभूमीवर वाहतूक करणेसाठीच्या निविदेस सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरिता देयकामध्ये ६% वाढ देणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- नागरी घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी अधिनियम २०१६ अन्वये महानगरपालिकांतर्गत असलेल्या ९ प्रभाग समिती निहाय २० झोन तयार करुन दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन करुन क्षेपणभूमीवर वाहतुक करणे इत्यादी कामांसाठी इच्छूक संस्था/कंत्राटदार/अभिकर्त्यांकडून सन २०१७-१८, सन २०१८-१९ सन २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षांकरिता मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.२६ दि.२०/०२/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेऊन ई-निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देण्यात आली होती. दिनांक ०२/०३/२०१७ रोजी जाहिर ई-निविदा राज्यस्तरीय व स्थानिक दैनंदिन वृत्तपत्रात प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार निविदा प्रक्रिया पुर्ण करुन मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४४९ दि.१२/१२/२०१७ अन्वये संविदा आणि करारनामा करुन मंजूर निविदाकरांस कार्यादेश देण्यात आला होता.

शहराचे वाढते नागरीकरणामुळे कचऱ्याच्या प्रमाणात वाढ होत असल्याने आणि प्रभाग निहाय स्वच्छता निरीक्षकांच्या अहवालानुसार मनुष्यबळात वाढ करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.५४८ दि.०१/०२/२०१९ नुसार वाढीव मनुष्यबळ पुरवठा करणेकामी मंजूरी देण्यात येऊन वाढीव मनुष्यबळ पुरवठा करणेकामी मंजूर निविदाकारांना कार्यादेश देण्यात आला होता. सदर निविदेच्या कालावधीमध्ये ठेकेदारांना निविदेतील अटीशर्तीनुसार द्वितीय व तृतीय वर्षी देयकामध्ये ६% वाढ देण्यात आली होती.

सदर निविदेचा कालावधी संपुष्टात येत असल्याने खालील प्रमाणे मुदतवाढ देण्यात आली होती.

तक्ता क्र. १

ठराव	दिनांक	मुदवाढ क्र.
प्रशासकीय ठराव क्र.५७८	०८/०३/२०२१	१
प्रशासकीय ठराव क्र.५२६	२७/०८/२०२१	२
प्रशासकीय ठराव क्र.०२	०६/०४/२०२२	३
प्रशासकीय ठराव क्र.७५	२२/०४/२०२२	४
प्रशासकीय ठराव क्र.३०४२	३१/०३/२०२३	५
प्रशासकीय ठराव क्र.११७०	३०/०७/२०२३	६
प्रशासकीय ठराव क्र.१७७८	२७/०९/२०२३	७

याकामी सदर निविदेस प्रशासकीय ठराव क्रमांक १७७८, दि.२७/०९/२०२३ रोजी अन्वये दि. ३१/१२/२०२४ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. तत्पुर्वी संबंधित ठेकेदार यांनी सन २०२१-२२ व २०२२-२३ या वित्तीय वर्षात ६% भाववाढ दिली नसल्याने दिनांक १७/०५/२०२२ रोजी दोन्ही वर्षाकरिता स्वतंत्र ६% भाववाढ मिळणेबाबत पत्र दिले होते. त्याअनुषंगाने मा. अतिरीक्त आयुक्त सो (द.) यांच्या अध्यक्षतेखाली मनपाच्या निविदा समिती स्थापन करण्यात आली होती. याकामी निविदा समितीने खालीलप्रमाणे अटी शर्ती नुसार ६% फरकाची रक्कम देणे बाबत शिफारस केली होती.

१) प्रथमत: जुलै २०२२ च्या मासिक देयकात ६% भाव वाढ देण्यात यावी. (रु.८३.१३ लक्ष)

२) तद्नंतर माहे एप्रिल -२०२२ ते जुन -२०२२ या कालावधी मधिल तीन महीन्यांचा फरक देण्याची कार्यवाही करावी. (रु.२.४० कोटी)

३) ६% वाढीनुसार सन २०२२-२३ या आर्थिक वर्षभरात येणाऱ्या रु.९.९७ कोटी रक्कमेची सुधारीत प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी.

४) महापालिकेची सद्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता सन २०२१-२२ या वित्तिय वर्षातील ६% फरकाची रक्कम देणेबाबत मा. स्थायी व मा. सर्वसाधारण सभेच्या निणयार्थ सादर करणेत यावे.

५) सदर कार्यवाही बाबत लेखा आक्षेप आल्यास नगरविकास विभाग शासन निर्णय दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१६ अन्वये सदरची रक्कम संबंधित ठेकेदार यांच्या मासिक देयकातुन वसुल पात्र असेल.

त्यानुसार निविदा समितीच्या शिफारसी नुसार सन २०२५-२६ या वित्तीय वर्षासाठी प्रशासकीय ठराव क्र. १४१७, दि.१६/१०/२०२५ अन्वये ६% वार्षिक वाढ देण्यात येऊन एकूण ३६% भाववाढ देण्यात आलेली आहे. याप्रमाणे सदर निविदेस पुढील प्रमाणे ६% वाढीस मान्यता दिलेली आहे.

परंतु वरीलप्रमाणे ६% वाढ दिली असली तरी सन २०२१-२२ या वित्तीय वर्षामध्ये मंजूर अभिकर्त्यांना कोव्हीड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रार्दुभाव असल्यामुळे सदरील मंजूर अभिकर्त्यांना ६% वाढ देण्यात आलेली नाही. परंतु सदर कालावधीत संबंधित यंत्रणेने कामकाज केलेले असून कोरोना नियंत्रणासाठी सदर घटकाने मोलाची भुमीका पार पाडली आहे. तसेच भाववाढ मागण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक बाबी जसे लोकसंख्येतील झालेली वाढ, वाहनांचा झालेला अतिरिक्त वापर, मनुष्यबळाचा झालेला अतिरिक्त वापर सदर कामाच्या कार्यक्षेत्रात झालेली वाढ, वाढलेला महागाई निर्देशांक, कचऱ्याचे वाढलेले प्रमाण,

डिझेलच्या दरात झालेली वाढ, कचरा वहन करणेसाठी वाढलेल्या खेपा इ. बाबी संबंधितांनी मागणी पत्रात सादर केलेल्या असून त्याची पडताळणी केलेली आहे व ती बरोबर असल्याची विभागाने खात्री केलेली आहे. त्यानुसार सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाच्या ६% वाढची मागणी अभिकर्त्यांमार्फत करण्यात आलेली आहे. तरी, सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरिता ६% वाढ दिल्यास खालीलप्रमाणे वित्तीय वर्ष २०२१-२२ च्या ६% वाढीच्या फरकासह अपेक्षित खर्चाची परिगणना होत आहे.

तक्ता क्र. २

झोन क्र.	कंत्राटदाराचे नाव	एप्रिल २०२१ मार्च २०२२ (१८ टक्के वाढीने अदा करावयाची रक्कम	एप्रिल २०२१ मार्च २०२२ (१२ टक्के वाढीने अदा केलेली रक्कम	फरक
१	मे. श्री अनंत एंटरप्रायजेस	१६१५५०८११.८७	१५३३३६३६३.००	८६२५१७१.३१
२	मे. उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर	११६११२५२२.५०	११०२०८४९५.००	६१९९२२८.८८
३	मे. साई गणेश एंटरप्रायजेस	१४९५८५३२३.१४	१४१९७९२९०.००	७९८६३३४.८०
४	मे. रेन्बो कंस्ट्रक्शन	४९१२१५२६.९३	४६६२३८२०.६६	२६२२५९१.५८
५	मे. श्री अनंत एंटरप्रायजेस	९५७२२५९८.१०	९०८५५३४५.८७	५११०६१४.८४
६	मे. दिनशे बी. संखे	७०४३९०८४.६८	६६८५७४३३.००	३७६०७३४.२६
७	मे. रिलायबल एजन्सी	४८५५५०२१.१९	४६०८६१२१.९८	२५९२३४४.१७
८	मे. हेना इंटरप्रायजेस	११०३५४९२०.३०	१०४७४३९८९.००	५८९१४७७.८७
९	मे. श्री अनंत एंटरप्रायजेस	११९७२६७६०.७३	११३६३८९६०.०७	६३९२१९०.७०
१०	मे. साई गणेश एंटरप्रायजेस	६४५८६९३७.९८	६१५१२७९३.००	३२२७८५२.२२
११	मे. हेना इंटरप्रायजेस	४९०९८७५९.५७	४६६२४५६२.००	२५९७९०७.४४
१२	मे. उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर	६८९७६८९४.६९	६५४८२०७६.००	३६६९५५९.६२
१३	मे. उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर	६९५२४०६७.८९	६५९८८९४८.००	३७११८७५.८८
१४	मे. रिलायबल एजन्सी	४१३०६२४२.०६	३९५५७०५५.४८	१८३६६४५.९१
१५	मे. शिवम एंटरप्रायजेस	६४०८२०५६.४७	६०८२३६४७.१८	३४२१३२९.७६
१६	मे. साई गणेश एंटरप्रायजेस	५५९४३७८१.८३	५३०९९१८७.००	२९८६८२४.५७
१७	मे. रिलायबल एजन्सी	१९९९६५८७१.७८	१८९७९८११४.३०	१०६७६१४५.३५
१८	मे. मैनदिप एन्टरप्रायझेस	८५१६१६३३.९८	८०८३१३८८.००	४५४६७५८.२७
१९	मे. आर. ॲन्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि.	५५९२५९५५.१०	५३०८०१६४.००	२९८८०८०.६५
२०	मे. दिनशे बी. संखे	३९७२१६६९.८०	३७७०१९२१.००	२१२०७३६.२४
	एकूण	१७१५४६२४४०.५८	१६२८८२९६७४.५४	९०९६४४०४.३४

नागरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन रस्तेसफाई, गटारसफाई, कचरा संकलन व क्षेपणभूमीवर वाहतूक करणेसाठीच्या नेमणूक केलेल्या ठेकेदारांना वित्तीय वर्ष एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ साठीच्या देयकावर ६% वाढ देऊन त्यानुसार येणाऱ्या एकूण **रक्कम रु. ९,१५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. नऊ कोटी पंधरा लक्ष मात्र)**एवढा खर्च येणार आहे. सदरील खर्च हा सन २०२५-२६ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ते, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणे इ. साफसफाईसाठी घंटागाडी,

यांत्रिक झाडू उपलब्ध करणेसह सफाई ठेका व भाड्याच्या वाहनाद्वारे यांत्रिक पद्धतीने नालेसफाई या लेखाशिर्ष अंतर्गत तरतुद रक्कम रु. २५० कोटी मधून भागविणे शक्य आहे.

तरी नागरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन रस्तेसफाई, गटारसफाई, कचरा संकलन व क्षेपणभूमीवर वाहतूक करणेसाठीच्या नेमणूक केलेल्या ठेकेदारांना वित्तीय वर्ष एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ साठीच्या देयकावर ६% वाढ देऊन त्यानुसार येणाऱ्या एकूण **रक्कम रु. ९,१५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. नऊ कोटी पंधरा लक्ष मात्र)** या रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी पुढील प्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

प्रस्तावाचा निर्णय :- नागरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन रस्तेसफाई, गटारसफाई, कचरा संकलन व क्षेपणभूमीवर वाहतूक करणेसाठीच्या नेमणूक केलेल्या ठेकेदारांना वित्तीय वर्ष एप्रिल २०२१ ते मार्च २०२२ साठीच्या देयकावर ६% वाढ देऊन त्यानुसार येणाऱ्या एकूण **रक्कम रु. ९,१५,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. नऊ कोटी पंधरा लक्ष मात्र)** या रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

तसेच, सदर भाववाढ दिल्याने देयकामध्ये अतीप्रदान झाल्याचे लेखा आक्षेप आल्यास नगरविकास विभाग शासन दि. ०१ फेब्रुवारी, २०१६ अन्वये सदरची अतीप्रदान रक्कम संबंधित ठेकेदार यांच्या मासिक देयकातून वसूल पात्र असेल, असा निर्णय घेण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भाप्रसे)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.) जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०३
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र.१६८८

विभाग :- सार्व. बांधकाम
दिनांक :-०८/१२/ २०२५

प्रस्तावाचा विषय :- **वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व प्रभाग समिती कार्यालयांच्या डिझाईन, सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे, निविदा प्रक्रिया व बांधकाम व्यवस्थापन सेवांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करणेबाबत.**

प्रस्तावाचा मजकूर :- वसई - विरार शहर महानगरपालिकेची स्थापना सन २००९ मध्ये भुतपूर्व ४ नगरपरिषदा व परिसरातील ५३ गावांचा समावेश होऊन झाली आहे. महापालिका क्षेत्राची सन २०११ च्या जनगणनेनुसार १२.२३ लक्ष इतकी लोकसंख्या असून सद्याची अंदाजे २५ लक्षहुन अधिक लोकसंख्या झाली आहे. महापालिकेचे क्षेत्रफळ ३१९.३९ चौ. कि.मी. इतके विस्तारीत असून बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रालगत व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विकास क्षेत्रात येत आहे. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्राचा नागरीकरणाचा वेग मोठ्या प्रमाणावर असून लोकसंख्येतही वाढ होत आहे.

वसई-विरार उप प्रदेशाच्या विकास आराखड्यास शासनाने दि.०९/०२/२००७ अन्वये मान्यता दिली असून महाराष्ट्र शासन राजपत्र, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई दि. २१/०२/२०१५ च्या अधिसूचनेव्दारे महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार महापालिका क्षेत्राबाहेरील १२ गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून महापालिकेस प्राधिकृत केले आहे. सद्यस्थितीत वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत एकूण ९ प्रभाग समिती कार्यरत आहेत.

वसई–विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती कार्यालयांच्या इमारतींबाबत करण्यात आलेल्या तपासणीत असे निदर्शनास आले की प्रभाग समिति डी -अचोळे येथील प्रभाग समिती कार्यालयाची संरचनात्मक तपासणीत (Structural Audit) सदर इमारत "C–२A" वर्गात घोषित करण्यात आलेली आहे. सदर वर्गवारीनुसार इमारत वापरासाठी असुरक्षित असून, कर्मचारी व नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सद्यस्थितीत कार्यालयीन कामकाज करणे जोखमीचे आहे.

तसेच महानगरपालिकेतील इतर प्रभाग समिती कार्यालयांमध्येही कार्यालयीन जागा अपुरी असल्याचे निदर्शनास आले आहे. सध्याच्या प्रशासनिक गरजा, वाढती कर्मचारी संख्या, नागरिकांसाठी प्रतीक्षालय, बैठक/सभागृह, अभिलेख कक्ष, संगणक कक्ष तसेच भविष्यातील अतिरिक्त मनुष्यबळासाठी आवश्यक जागा उपलब्ध नाही. परिणामी, प्रशासनिक कामकाजावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

सदर परिस्थिती लक्षात घेता, नवीन प्रभाग समिती कार्यालयांचे नियोजन व बांधकाम करणे अत्यावश्यक झालेले आहे. नवीन इमारतींच्या बांधकामामुळे संरचनात्मक सुरक्षितता सुनिश्चित होईल, कायदेशीर व नियमांच्या अधीन तरतुदी (NBC, अग्निसुरक्षा, दिव्यांग सुलभता) पूर्ण होतील, वारंवार होणारा दुरुस्तीचा खर्च टाळता येईल, महानगरपालिकेची कायमस्वरूपी भांडवली मालमत्ता निर्माण होईल.

सदर प्रकल्पासाठी डिझाइन तयार करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) बनविणे, खर्च अंदाज व BOQ तयार करणे, ठेकेदार नियुक्तीसाठी निविदा प्रक्रिया राबविणे तसेच बांधकाम व्यवस्थापन व देखरेख करणे या बाबी तांत्रिकदृष्ट्या आवश्यक असून, यासाठी पात्र सल्लागाराची नियुक्ती करणे अपरिहार्य आहे.

त्याअनुषंगाने, "प्रभाग समिती कार्यालयांच्या डिझाइन, DPR, निविदा प्रक्रिया व बांधकाम व्यवस्थापन सेवांसाठी **प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार** नियुक्ती" याबाबत निविदा प्रसिद्ध करणे गरजेचे आहे.

<u>आर्थिक बाबी व तरतुदी:</u>

सदर कामासाठी होणारा खर्च हा संरचनात्मक सुरक्षितता, प्रशासकीय गरज व दीर्घकालीन आर्थिक हित लक्षात घेऊन आवश्यक असून पुनरावृत्ती खर्च टाळण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत

आहे. सदर कामासाठी होणारा खर्च हा भांडवली स्वरूपाचा असून महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकातील संबंधित लेखाशीर्षाखाली तरतूद उपलब्ध असल्याचे निश्चित करायचे आवश्यक आहे. तसेच सदर Request For Proposal (RFP) ई–निविदा प्रणालीद्वारे प्रसिद्ध करण्यात येणार असल्याने आर्थिक पारदर्शकता व स्पर्धात्मकता सुनिश्चित होणार आहे.

निविदा प्रक्रियेतील प्रचलित नियमांनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR), खर्च अंदाज व बिल ऑफ क्वांटिटीज (BOQ) हे पात्र व तज्ज्ञ सल्लागारामार्फत तयार करणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक प्रभाग समिति कार्यालयसाठी प्रस्तावित स्थळांची भौगोलिक स्थिति, क्षेत्रफळ, उपलब्ध सुविधा, पोहोच रास्ता, तसेच आवश्यक बांधकाम क्षेत्र या मध्ये फरक असल्याने प्रत्येक स्थळासाठी खर्च अंदाज व आवश्यकतांमध्ये लक्षणीय फरक असण्याची शक्यता आहे. सल्लागाराची नियुक्ती न केल्यास अचूक खर्च अंदाज तयार करणे शक्य होणार नाही. त्यामुळे, सदर कामासाठी सल्लागाराची नियुक्ती ही प्रक्रियात्मकदृष्ट्या अनिवार्य आहे.

तरी , वरील सर्व बाबींचा विचार करता, वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व प्रभाग समिति कार्यालयांच्या डिझाईन, सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे, निविदा प्रक्रिया व बांधकाम व्यवस्थापन सेवांसाठी **प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करणेबाबत** निविदा प्रसिद्ध करण्याचा प्रस्ताव मान्यतेसताव सादर.

निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व प्रभाग समिती कार्यालयांच्या डिझाईन, सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे, निविदा प्रक्रिया व बांधकाम व्यवस्थापन सेवांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, यशवंत नगर, विरार (प.) जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०३
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १६९९ विभाग :- सार्व. बांधकाम
दिनांक :-०९/१२/ २०२५

प्रस्तावाचा विषय :- **वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आचोळे सर्व्हे नं. ६ येथे ४०० खाटांचे बहुविशेषज्ञ (Multispeciality) रुग्णालय उभारणेसाठी तज्ञ तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणेस मान्यता देणेबाबत.**

प्रस्तावाचा मजकूर :- वसई - विरार शहर महानगरपालिकेची स्थापना सन २००९ मध्ये भुतपूर्व ४ नगरपरिषदा व परिसरातील ५३ गावांचा समावेश होऊन झाली आहे. महापालिका क्षेत्राची सन २०११ च्या जनगणनेनुसार १२.२३ लक्ष इतकी लोकसंख्या असून सद्याची अंदाजे २५ लक्षहुन अधिक लोकसंख्या झाली आहे. महापालिकेचे क्षेत्रफळ ३१९.३९ चौ. कि.मी. इतके विस्तारीत असून बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रालगत व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विकास क्षेत्रात येत आहे. वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्राचा नागरीकरणाचा वेग मोठ्या प्रमाणावर असून लोकसंख्येतही वाढ होत आहे.

वसई-विरार उप प्रदेशाच्या विकास आराखड्यास शासनाने दि.०९/०२/२००७ अन्वये मान्यता दिली असून महाराष्ट्र शासन राजपत्र, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई दि. २१/०२/२०१५ च्या अधिसूचनेव्दारे महाराष्ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार महापालिका क्षेत्राबाहेरील १२ गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून महापालिकेस प्राधिकृत केले आहे.

शहरातील लोकसंख्या झपाट्याने वाढत असून विद्यमान आरोग्यसेवा केंद्रांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. सध्याच्या नागरी क्षेत्रात बहुविशेषज्ञ उपचार सुविधा मर्यादित प्रमाणात उपलब्ध असल्याने नागरिकांना अत्यावश्यक उपचारांसाठी दूरच्या रुग्णालयांकडे जावे लागते. यामुळे वेळ, खर्च तसेच रुग्णांच्या आरोग्याचा धोका वाढतो. या पार्श्वभूमीवर शहरात सुसज्ज व आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त सार्वजनिक बहुविशेषज्ञ रुग्णालय उभारणे अत्यावश्यक आहे, जेणेकरून स्थानिक पातळीवर गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध होईल आणि सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची कार्यक्षमता व विश्वासार्हता वाढेल.

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आचोळे सर्व्हे नं. ६ येथे मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल इमारतीसाठी महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन ज्ञापन क्रमांक : जमीन-२७अ२५/प्र.क्र.१५७/ज-४अ, दि.०१/ ऑक्टोबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार मौजे आचाळे येथील स.नं./ग.नं.६/१, एकुण क्षेत्र ६.०८.० हे आर.पैकी आर झोन क्षेत्र ०.९०.३८ हे.आर जमीन मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल इमारतीसाठी वसई विरार शहर महानगरपालिकेस वर्ग करणेबाबत शासन निर्णय प्राप्त झाले आहे. त्या अनुषंगाने सदर ठिकाणी तातडीने मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल इमारत उभारणे आवश्यक आहे.

तरी, विषयांकीत **भुखंडावर ४०० खाटांचे बहुविशेषज्ञ (Multispeciality) रुग्णालय** उभारण्याच्या अनुषंगाने सदर रूग्णालयाचे सविस्तर आराखडे, नकाशे, Detailed Project Report (DPR) तयार करणे, संबंधित प्राधिकरणाशी समन्वय (Liaisoning) करणे, बांधकामाच्या अमलबजावणीवर देखरेख ठेवणे, खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे व रुग्णालय उभारण्याचे काम हाती घेणेकरीता निविदा तयार करणे प्रकरणी Detailed Tender Proposal (DTP) तयार करणे तसेच इतर

सलग्न, पुरक व आवश्यक कामकाज पार पाडण्यासाठी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे दि.२६/०९/२०२५ रोजी तज्ञ सल्लागाराच्या नेमणूकीसाठी निविदा शासन संकेत स्थळावर व दि.२७/०९/२०२५ रोजी दै. The Economic Times, The Free Press Journal, दै.हमारा महानगर, दै.नवभारत, दै.चौफेर संघर्ष, दै.लोकमत तसेच दै.महाराष्ट्र टाईम्स या वृत्तप्रत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. एकुण ८ उमेदवारांमार्फत अर्ज प्राप्त झाले. दि.०८/१०/२०२५ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त (उत्तर) व मा.शहर अभियंता, यांच्या अध्यक्षतेखाली उपस्थित ७ उमेदवारांचे सादरीकरण घेण्यात आले.

सदर सादरीकरणांदरम्यान उमेदवारांनी असे नमूद केले की, सादरीकरण तयार करणेसाठी मर्यादित वेळ उपलब्ध असल्यामुळे त्यांनी प्रकल्पासंबंधी आवश्यक संकल्पना, आराखडा व तांत्रिक बाबी सविस्तरपणे मांडू शकले नाहीत. त्यामुळे सदर सादरीकरणांबाबत झालेल्या चर्चेनुसार मा.आयुक्त महोदय यांनी उपरोक्त ४०० खाटांचे बहुविशेषज्ञ (Multispeciality) रुग्णालय उभारण्याच्या प्रस्तावा प्रकरणी अधिक संख्येने पात्र व अनुभवी तज्ञ तांत्रिक सल्लागारांना सहभागी होण्यासाठी तसेच दर्जदार व सर्वसमावेषक प्रस्ताव प्राप्त करण्याच्या उद्देशाने पुन: एकदा फेर निविदा करण्याचे निर्देश दिले, जेणेकरून रूग्णालयाच्या आराखडयासाठी अधिक नवोन्मेषी, गुणवत्तापूर्ण व कार्यक्षम पर्याय उपलब्ध होऊ शकतील.

तरी प्रस्तावित ४०० खाटांचे बहुविशेषज्ञ (Multispeciality) रुग्णालय प्रकरणी तज्ञ तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणेकामी फेर निविदा जाहीर करून EOI (Expression of Interest) मागविण्यात आले. दि.१०/१०/२०२५ रोजी तज्ञ सल्लागाराच्या नेमणूकीसाठी निविदा शासन संकेत स्थळावर व दि.१०/१०/२०२५ रोजी दै. The Economic Times, दै.मिड-डे, दै.जागरूक टाईम्स, दै.नवभारत, दै.चौफेर संवर्ष, दै.लोकमत तसेच दै.महाराष्ट्र टाईम्स या वृत्तप्रत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. एकुण १४ उमेदवारांमार्फत अर्ज प्राप्त झाले. प्राप्त सल्लागारांची यादी खालील प्रमाणे.

Sr.No.	Name Of Consultants	Sr.No.	Name Of Consultants
1	Hiten Sethi & Associates	8	Quandrant Consultant
2	Arch En Design	9	Skyline Architect
3	Airborne Group	10	Apices studio Pvt Ltd.
4	Prashant Bajpai	11	UB Architects
5	Nippon Koei India Pvt Ltd.	12	Aseptic Ventures
6	B.J. Mehta Architectural & structural Consultant Pvt Ltd.	13	Muralage
7	Global Engineering Services	14	M B Malewar designs Pvt.ltd. (MBM)

प्राप्त १४ EOI मधुन योग्य त्या अनुभवी सल्लागाराची/ आर्किटेक्ट नेमणूक करण्याकरीता समिती गठित करणे गरेजेचे असल्याने मा.आयुक्त महोदय यांच्या मान्यतेने सदर समितीमध्ये खालील नमुद सदस्यांचे समावेश करण्यात आले.

१) अतिरिक्त आयुक्त (वैद्यकीय)
२) प्र.शहर अभियंता
३) कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग)
४) सहा. उप संचालक
५) उप अभियंता (बांधकाम विभाग)

वरील समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी केली असता विषयांकीत प्रस्तावाकरीता सुसंगत व सुयोग्य प्रस्तावांच्या सादरीकरणासाठी खालील नमुद ९ सल्लागारांना आमंत्रित केले. दि.१७/११/२०२५ रोजी मा.अतिरिक्त आयुक्त वैद्यकिय, नगररचनाकार नगररचना विभाग, उप अभियंता (बांधकाम विभाग), वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांच्या उपस्थितीत खालील प्रमाणे नमुद निवडलेल्या ९ उमेदवारांचे सादरीकरण घेण्यात आले.

Sr.No.	Name Of Consultants	Sr.No.	Name Of Consultants
1	Global Engineering Services	6	Hiten Sethi & Associates
2	UB Architects	7	Airborne Group
3	Apices studio Pvt Ltd.	8	Skyline Architect
4	Muralage	9	Nippon Koei India Pvt Ltd.
5	Arch En Design		

सदर सादरीकरणानुसार उक्त गठीत समिती सदस्यांमार्फत सर्वानुमते विषयांकीत कामासाठी मे.U/B आर्किटेक्ट या सल्लागार यांनी सादर केलेले डिझाईन हे सर्वात सुयोग्य असल्याचे नेमलेल्या समितीचे मत झाले आहे.

त्यानुसार दि.०८/१२/२०२५ रोजी मे.U/B आर्किटेक्ट यांना Letter of Intent देऊन दि.०९/१२/२०२५ रोजी वाटाघाटीकरीता आमंत्रित केले असता मा.आयुक्त महोदय यांच्या समक्ष झालेल्या चर्चेनुसार विषयांकीत कामासाठी सल्लागाराची नियुक्ती करून त्यास अदा करण्यात येणारे शुल्क हे शासन निर्णय क्र. :खाक्षेस-२०१८/प्र.क्र.७५/रस्ते-९अ, दि.२५ जानेवारी, २०१९ प्रमाणे प्रकल्प किंमतीचे १.५०% तसेच शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.५४/नवि-१६, दि. ०४ जून, २०१८ प्रमाणे प्रकल्प किंमतीचे २% असे एकुण प्रकल्प किंमतीचे ३.५० % शुल्क अदा करणे बाबतचे निर्देश देण्यात आले आहे.

तरी मे.U/B आर्किटेक्ट यांस वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आचोळे सव्हे नं. ६ येथे ४०० खाटांचे बहुविशेषज्ञ (Multispeciality) रुग्णालय उभारणेसाठी सल्लागार म्हणून नेमण्याचा प्रस्ताव तसेच त्यांस प्रकल्प किंमतीचे ३.५० % शुल्क अदा करणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आचोळे सर्व्हे नं. ६ येथे ४०० खाटांचे बहुविशेषज्ञ (Multispeciality) रुग्णालय उभारणेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व वास्तुविशारद म्हणून मे.U/B आर्किटेक्ट यांची नेमणूक करणे व त्यांस एकत्रित शुल्क प्रकल्प किंमतीचे ३.५० % प्रमाणे अदा करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (प), जि.पालघर, पिन नं.401303
दुरध्वनी -2020-2525101/02/03/04 05/06, फॅक्स् -0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. १७००

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक: ०९/१२/2025

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) येथील आचोळे सर्वे क्र.६ मध्ये रुग्णालयाच्या इमारती करिता जिओ टेक्निकल सर्वे करणे, बोरिंग करुन मातीचे नमुने गोळा करणे व त्याचा अहवाल बनविणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई - विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) मधील आचोळे गांव येथील सर्वे क्र. ६ वर रुग्णालय इमारत बांधण्याकरिता शासन निर्णय क्र. मनपा२०२४ / प्र.क्र.१५६/भाग -३/ नवि - १६ (ई - ७८८४२५) अन्वये मंजुरी देण्यात आली आहे. सदर इमारतीचे आराखडे व नकाशे तसेच आर.सी.सी. डिझाईन बनविण्या करिता सदर जागेची मोजणी करणे, जिओ टेक्निकल सर्वे करणे, बोरिंग करुन मातीचे नमुने तपासुन त्याचा अहवाल बनविणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) येथील आचोळे सर्वे क्र. ६ मध्ये रुग्णालयाच्या इमारती करिता जिओ टेक्निकल सर्वे करणे, बोरिंग करुन मातीचे नमुने गोळा करणे व त्याचा अहवाल बनविणे** या कामाचे रक्कम रु. ४,१४,८६७/- इतक्या किमतीचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करुन सादर करीत आहे सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये मान्यतेस्तव तसेच सादर

कामाचे स्वरुप :- जिओ टेक्निकल सर्वे करणे मातीचे नमुने गोळा करणे व त्याचा अहवाल तयार करणे.

तरी सदर कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेऊन तांत्रिक मंजुरी घेणे, निविदा कार्यवाही करणे, संविदा मजुरी प्राप्त करणे, करारनामा करुन कार्यादेश देणे, काम सुरु करुन विहित मुदतीत पूर्ण करणे व देयक सादर करणे इ. सर्व प्रक्रिया पुढील नमुद कालमर्यादेत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

अ.क्र	बाब	अपेक्षित दिनांक
१	प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव	सक्षम प्राधिकाऱ्यांकडुन मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ
२	निविदा प्रसिद्धी करणे	२२/१२/२०२५
३	प्रथम लिफाफा उघडणे	२६/१२/२०२५
४	द्वितीय लिफाफा उघडणे	०२/०१/२०२६
५	संविदा मंजुरी ठराव	०८/०१/२०२६
६	कार्यादेश देणे / करारनामा करणे	१२/०१/२०२६
७	काम सुरु करणे	१३/०१/२०२६
८	काम पुर्ण करणे	१३/०३/२०२६
९	देयक सादर करणे	१७/०३/२०२६
१०	देयकाचे प्रदान करणे	२०/०३/२०२६
११	उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे	२३/०३/२०२६

वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) येथील आचोळे सर्वे क्र. ६ मध्ये रुग्णालयाच्या इमारती करिता जिओ टेक्निकल सर्वे करणे, बोरिंग करुन मातीचे नमुने गोळा करणे व त्याचा अहवाल बनविणे कामी बांधकाम विभागामार्फत चालु दरसुची सन **२०२२-२३** नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. **४,१४,८६७/-** अंदाजपत्रकास मा. उप आयुक्त यांची वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

प्रस्ताव :-

सदर काम खालील नमूद कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे

अ.क्र	बाब	अपेक्षित दिनांक
१	प्रशासकीय व वित्तीय मान्यता ठराव	सक्षम प्राधिकाऱ्यांकडुन मंजुरी मिळाल्यानंतर तात्काळ
२	निविदा प्रसिद्धी करणे	२२/१२/२०२५
३	प्रथम लिफाफा उघडणे	२६/१२/२०२५
४	द्वितीय लिफाफा उघडणे	०२/०१/२०२६
५	संविदा मंजुरी ठराव	०८/०१/२०२६
६	कार्यादेश देणे / करारनामा करणे	१२/०१/२०२६
७	काम सुरु करणे	१३/०१/२०२६
८	काम पुर्ण करणे	१३/०३/२०२६
९	देयक सादर करणे	१७/०३/२०२६
१०	देयकाचे प्रदान करणे	२०/०३/२०२६
११	उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे	२३/०३/२०२६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये आयुक्त यांचेकडील आदेश जा.क्र. वविशम/ लेखा/ ७७/ २०२५-२६ दि. ०४/०८/२०२५ अन्वये महानगरपालिकेच्या कामकाज सोयीच्या दृष्टीने उपायुक्त आणि अति. आयुक्त यांना अधिकार प्रधान केले आहेत. सदर कामाकरिता वरील नमुद केलेल्या कालमर्यादा पाळल्या न गेल्यास विभाग प्रमुख व त्यांचे अधिनिस्त कर्मचारी MCSR १९७९ प्रमाणे कार्यवाहिस पात्र राहतील. तसेच सदर कामामध्ये काही कारणास्तव (तांत्रिक, नैसर्गिक व इतर सबळ कारणास्तव) विलंब झाल्यास त्या त्या वेळी विलंबास सक्षम प्राधिकाऱ्याची मंजुरी घेणे बंधनकारक असेल तरी **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) येथील आचोळे सर्वे क्र. ६** मध्ये **रुग्णालयाच्या इमारती करिता जिओ टेक्निकल सर्वे करणे, बोरिंग करुन मातीचे नमुने गोळा करणे व त्याचा अहवाल बनविणे** कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. **४,१४,८६७/-** इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे. तसेच त्यानुसार सदर कामाच्या अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस मंजुरी देत आहे. तसेच अंदाजपत्रक मधील प्रत्येक टप्प्यावर केलेल्या कामाचे Geo - Tagging फोटोग्राफ्स सादर करणेत यावे. तदनंतर कामाची रक्कम अदा करण्यात यावी.

(अजित मुठे)
उप आयुक्त
परिमंडळ - ३
वसई - विरार शहर महानगरपालिका

वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), ता. वसई, जि. पालघर पिन नं. ४०१ ३०३
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७६०७ विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक : १०/१२/२०२५

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका रुग्णालयात स्पेक्ट्रम कॉलेज आफॅ फिजिओथोरेपी व कोकण शिक्षण आणि वैद्यकीय विश्वस्त संस्थेचे विरार होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज आणि हॉस्पिटल येथील विदयार्थ्यांना कार्यानुभव घेण्याकरीता परवानगी देणेबाबत मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात सद्यस्थितीत ७ रुग्णालये, २ माता बाल संगोपन केंद्रे, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ४५ आयुष्यमान आरोग्य मंदिर, १५ हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, आपला दवाखाना केंद्रे कार्यन्वित करण्यात आलेली असून यामध्ये कार्यक्षेत्रातील नागरीकांना वैद्यकीय सेवा देण्यात येते.

सदर स्पेक्ट्रम कॉलेज आफ फिजिओथोरेपी व कोकण शिक्षण या विदयार्थ्यांना भौतिकोपचार (फिजिओथोरेपी) पदवी करीता रुग्णालयात कार्यानुभव आणि वैद्यकीय विश्वस्त संस्थेचे विरार होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज आणि हॉस्पिटल येथील होमिओपॅथिक विदयार्थ्यांना कार्यानुभव घेणे करीता संदर्भिय पत्र क्र. १ व २ नुसार कार्यानुभव परवानगी मिळणे करीता पत्रांन्वये कळविण्यात आलेले आहेत.

तरी वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, येथे जि.एन.एम, यांना कार्यानुभव घेणकरीता त्यांना वेळोवेळी परवानगी देणेकरिता मा. वैद्यकिय सहाय्य व आरोग्य समिती मध्ये दिनांक २०/११/२०१९ रोजी ठराव झालेला आहे.

तरी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षाकरीता भौतिकोपचार (फिजिओथोरेपी) पदवी विदयार्थी व होमिओपॅथिक विदयार्थ्यांना यांना रुग्णालय /माता बाल संगोपन येथे कार्यानुभव घेण्याकरीता परवानगी देणेबाबत तसेच महानगरपालिका कार्यक्षेत्रात वैद्यकीय आरोगय विभागाअंतर्गत कार्यरत रूग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे या ठिकाणी विना अनुदान प्रशिक्षण घेणेकामी विविध नोदणीकृत स्पेक्ट्रम कॉलेज ऑफ फिजिओथोरेपी व कोकण शिक्षण या विदयार्थ्यांना भौतिकोपचार (फिजिओथोरेपी) पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी यांच्या मार्गदरर्शकानुसार शहरी कार्यानुभ्व घेणेकरीता परवानगी देणेकामी विचार करणे योग्य होईल.

सबब यानुसार स्पेक्ट्रम कॉलेज आफॅ फिजिओथोरेपी व कोकण शिक्षण आणि वैद्यकीय विश्वस्त संस्थेचे विरार होमिओपॅथिक मेडीकल कॉलेज आणि हॉस्पिटल च्या विद्यार्थ्यांना महानगरपालिकेचे माताबाल संगोपन केंद्र येथे कार्यानुभव घेणे करिता मंजूरी मिळणेस तसेच भविष्यात येणा-या विविध संस्थांच्या विद्यार्थी परिचारीकांना महानगरपालिचेी रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्र येथे कार्यानुभव घेण्याकरीता वेळोवेळी परवानगी देणेबाबत निर्णय होणे आवश्यक असल्याने सदरचा विषय शिफारस आहे.

ठराव/निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्र येथे भौतिकोपचार (फिजिओथोरेपी) पदवी विदयार्थी व होमिओपॅथिक विदयार्थ्यांना यांना रुग्णालय /माता बाल संगोपन येथे कार्यानुभव घेण्याकरीता मंजुरी मिळणेस तसेच भविष्यात येणा-या विविध संस्थांच्या विद्यार्थींना महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत रुग्णालय /माता बाल

संगोपन येथे कार्यानुभव घेण्याकरीता सदर स्पेक्ट्रम कॉलेज ऑफ फिजिओथोरेपी व कोकण शिक्षण तसेच येणा-या विविध संस्थाचे विदयार्थ्यांना भौतिकोपचार (फिजिओथोरेपी) पदवी करीता रुग्णालयात कार्यानुभव घेणे करीता परवानगी देणेस मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

10/12

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि. पालघर, पिन नं.401 303
दूरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107
ई-मेल – vasaivirarcorporation@ahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ७६०२ विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक :१०/१२/२०२५

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या दैनंदिन कामकाजाच्या व्यवस्थापनेसाठी सन २०२६-२७ या वित्तीय वर्षासाठी वार्षिक ई-निविदा मागविणेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य वर्धिनी केंद्रे व आपला दवाखाना यांच्या दैनंदिन कामकाजाच्या व्यवस्थापनेसाठी औषधे, प्रयोगशाळा रसायने, साथ प्रतिबंधक लस, उपकरणे, सर्जिकल साहित्य व तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तू, ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग सह सेवा व आवश्यक साहित्य पुरविणे, रक्त व रक्तघटक पुरविणे व वैद्यकीय सर्जिकल उपकरणे, इलेक्ट्रीक उपकरणे साहित्यासह देखभाल दुरुस्ती करण्याची आवश्यकता असते. त्यानुषंगाने सन २०२३-२६ या वित्तीय वर्षांकरीता ई-निविदा प्रक्रिया करण्यात आलेली आहे. सबब सदरच्या ई-निविदेचा कालावधी मार्च २०२६ पर्यंत संपुष्ठात येत आहेत. करीता सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाकरीता ई-निविदा प्रक्रिया राबविणे गरजेचे आहे.

सन २०२६-२७ या वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य वर्धिनी केंद्रे व आपला दवाखाना यांना आवश्यक असणारी औषधे, प्रयोगशाळा रसायने, साथ प्रतिबंधक लस, उपकरणे, सर्जिकल साहित्य व तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तू, ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग सह सेवा व आवश्यक साहित्य पुरविणे, रक्त व रक्त घटक पुरविणे व वैद्यकीय सर्जिकल उपकरणे, इलेक्ट्रीक उपकरणे साहित्यासह देखभाल दुरुस्ती करणेकामी वार्षिक ई-निविदा दर मागविण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेण्याची आवश्यकता आहे. नव्याने मागविण्यात येणाऱ्या ई-निविदेसाठी होणारा खर्च

"रुग्णालय औषध खरेदी", "रुग्णालय इतर साहित्य खरेदी", "श्वानदंश, सर्पदंश व इतर साथ प्रतिबंधक लस खरेदी व साथ प्रतिबंधक उपाययोजना", "ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंगसह अन्य रुग्णालयीन उपकरणे खरेदी व देखभाल दुरुस्ती", " रक्त व रक्तघटक पुरविणे" व "रुग्णालय कपडे, चादरी ब्लँकेट खरेदी तसेच धुलाई व इस्त्री" या लेखाशिर्षाखालील संबंधित आर्थिक वर्षाच्या नमुद तरतुदीमधून भागविता येणे शक्य होणार आहे. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	तपशिल	सन २०२६-२७ ची अर्थसंकल्पिय तरतुद (अंदाजित) (प्रस्तावित अपेक्षित खर्चाची रक्कम)
१	२	३
१	वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य वर्धिनी केंद्रे व आपला दवाखाना यांचेकरीता औषधे, प्रयोगशाळा रसायने व साथ प्रतिबंधक लस खरेदी करुन पुरवठा करणे.	१) रुग्णालय औषध खरेदी रु.२०,००,००,०००/- मधील रु.८,००,००,०००/- २) श्वानदंश, सर्पदंश व इतर साथ प्रतिबंधक लस खरेदी व साथ प्रतिबंधक उपाययोजना रु.३,००,००,०००/- मधील रु.१,००,००,०००/- (लस खरेदीकरीता) **एकूण - रु.९,००,००,०००/-**
२	वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य वर्धिनी केंद्रे व आपला दवाखाना यांचेकरीता उपकरणे, सर्जिकल साहित्य व तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तू खरेदी करुन पुरवठा करणे.	१) ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंगसह अन्य रुग्णालयीन उपकरणे खरेदी व देखभाल दुरुस्ती रु.८,००,००,०००/- मधील रु.४,००,००,०००/- २) रुग्णालय इतर साहित्य खरेदी रु.१०,००,००,०००/- मधील रु.५,७०,००,०००/- ३) रुग्णालय कपडे, चादरी, ब्लँकेट खरेदी तसेच धुलाई व इस्त्री रु.३०,००,०००/- मधील रु.३०,००,०००/- **एकूण -रु.१०,००,००,०००/-**

३	वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, यांचेकरीता ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग सह सेवा व आवश्यक साहित्य पुरविणे.	१) ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंगसह अन्य रुग्णालयीन उपकरणे खरेदी व देखभाल दुरुस्ती रु.८,००,००,०००/- मधील रु.२,००,००,०००/- **एकूण - रु.२,००,००,०००/-**
४	वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, येथील वैद्यकीय सर्जिकल उपकरणे, इलेक्ट्रीक उपकरणे यांची देखभाल दुरुस्ती करणे.	१) ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंगसह अन्य रुग्णालयीन उपकरणे खरेदी व देखभाल दुरुस्ती रु.८,००,००,०००/- मधील रु.२,००,००,०००/- **एकूण - रु.२,००,००,०००/-**
५	वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, येथे रक्त व रक्तघटक पुरविणे.	१) रक्त व रक्त घटक पुरविणे. रु.८०,००,०००/- मधील रु.४०,००,०००/- **एकूण - रु.४०,००,०००/-**

तरी वरील तक्त्यात नमुद कामांच्या सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाकरीता उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भाखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ दि.१ डिसेंबर २०१६ व उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय मधील महाईटेंडर व्दारे वा दि.२४ ऑगस्ट २०१७ मधील जी.ई.एम पोर्टलव्दारे खरेदी करावयाचे पध्दतीनुसार व दिलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे प्रारुप ई-निविदा संच तयार करुन महानगरपालिकेची सर्व रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, आरोग्य वर्धिनी केंद्रे व आपला दवाखाना यांच्या दैनंदिन कामकाजाकरीता आवश्यक असणारी औषधे, प्रयोगशाळा रसायने, साथ प्रतिबंधक लस, उपकरणे, सर्जिकल साहित्य व तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तू, ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग सह सेवा व आवश्यक साहित्य पुरविणे, रक्त व रक्त घटक पुरविणे व वैद्यकीय सर्जिकल उपकरणे, इलेक्ट्रीक उपकरणे साहित्यासह देखभाल दुरुस्ती करणेकामीच्या वार्षिक ई-निविदा मागविणेस मंजुरी मिळणेची आवश्यकता असल्याने सदरच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यतेची आवश्यकता आहे.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या दैनंदिन कामकाजाच्या व्यवस्थापनेसाठी सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाकरीता औषधे, प्रयोगशाळा रसायने, साथ प्रतिबंधक लस, उपकरणे, सर्जिकल साहित्य व तद्अनुषंगीक

उपभोग्य वस्तू, ऑक्सिजन सिलिंडर रिफिलिंग सह सेवा व आवश्यक साहित्य पुरविणे, रक्त व रक्तघटक व वैद्यकीय सर्जिकल उपकरणे, इलेक्ट्रीक उपकरणे साहित्यासह देखभाल दुरुस्ती याकामीच्या वार्षिक ई-निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या संपुर्ण खर्चास महाराष्ट्र महापालिका अधिनियम ६७ (३) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी (भा.प्र.से)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार

प्रशासकीय ठराव क्र. ९६०३ **दि.**१०/१२/२०२५.

विषय :- श्री.अंकुश चंद्रशेखर पाटील यांना लाड समिती शिफारसीनूसार महानगरपालिका सेवेत सफाई कामगार या पदावर सामावून घेणेबाबत...

प्रस्तावाचा मजकूर : वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत श्री. चंद्रशेखर विनायक पाटील, सफाई कामगार यांचे सेवापुस्तकाची तपासणी केली असताना त्यांची नियुक्ती ग्रामपंचायत नवघर माणिकपूर नगरपरिषद दि.१६ जुन १९९५ चा आदेश क्र.एमसीके-१०९४/सीआर-५४८/९४/३ नगरपालिका प्रशासन संचालनालय यांचेकडील आदेशानुसार माहे ०५/०५/१९९४ पासून सफाई कामगार या पदावर कायम करण्यात आले. श्री. चंद्रशेखर विनायक पाटील हे नियत वयोमानानुसार सेवेतून दि.३१/०७/२०२५ रोजी सेवानिवृत्त झालेले आहे.

श्री. चंद्रशेखर विनायक पाटील यांना नियमित केलेल्या दिनांकापासून ते सेवानिवृत्त दिनांक ३१/०७/२०२५ पर्यंतची महानगरपालिकेत एकूण ३१ वर्षे सेवा झाली आहे.

श्री. चंद्रशेखर विनायक पाटील, सेवानिवृत्त सफाई कामगार मी वसई विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत होतो. मी दि.३१/०७/२०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवेतून सेवानिवृत्त झालो आहे. माझ्या जागेवर माझा मुलगा श्री.अंकुश चंद्रशेखर पाटील यांना वारसा हक्काने महानगरपालिका आस्थापनेवर नोकरी मिळावी हि नम्र विनंती असे कळविले आहे.

श्री. अंकुश चंद्रशेखर पाटील यांनी माझे वडिल चंद्रशेखर विनायक पाटील सेवेत असताना दि.३१/०७/२०२५ रोजी सेवानिवृत्त झाले असून, वडिलांच्या जागी मला वारसा हक्काने नोकरी मिळावी हि नम्र विनंती असे कळविले आहे.

सेवानिवृत्त सफाई कर्मचा-यांच्या वारसा हक्क नियुक्ती प्रस्तावाचे छाननी पत्रक

अ) सेवानिवृत्त सफाई कामगारांची माहीती

अ.क्र.	माहितीचा तपशिल	आवश्यक कागदपत्रे		शेरा
१	श्री. चंद्रशेखर विनायक पाटील	वारस हक्काने		
२	जन्म दिनांक. ०५/०७/१९६५	सेवापुस्तकाची सांक्षाकीत प्रत		
३	नियुक्ती दिनांक ०५/०५/१९९४	सेवापुस्तकाची सांक्षाकीत प्रत		
४	मुळ नियुक्ती पध्दत-	**सरळसेवा**		
५	सफाई कामगार या पदावरुन पदोन्नती दिली आहे काय असल्यास पदनाम	पदोन्नती दिलेली नाही.		
६	महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणुन केलेली एकुण सेवा-	३१ वर्षे		
७	कोणत्या पदावर सेवासमाप्ती	**सफाई कामगार**		
८	कोणत्या तारखेला पद रिक्त	----------	**दि.३१/०७/२०२५**	
९	सेवासमाप्तीचा प्रकार	**नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे**		

१०	पद रिक्त झाल्याचे कारण	**नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे**		
११	सेवा कालावधीनुसार वारस पात्र आहे काय	**होय, पात्र आहे...**		

ब) वारसाची माहीती

	तपशिल		**पुरावा दाखल कागदपत्र**
१	वारसाचे नाव	श्री.अंकुश चंद्रशेखर पाटील	
२	वारसाचे नाते	मुलगा	सोबत कागपत्र जोडलेले आहेत.
३	वारसाचा जन्म दिनांक	दि. ०६/०२/१९९५	शाळा सोडल्याचा दाखला
४	वारसाचे अर्ज करते वेळी वय	एकुण ३० वर्ष	अनुज्ञेय आहे...
५	वारस हक्क नियुक्तीसाठी मनपाकडे प्राप्त वारसाचा अर्ज दिनांक	अर्ज दि. ०९/०९/२०२५	पात्रता योग्य आहे
६	वारसाची शैक्षणीक अर्हता	बी.कॉम	साक्षांकीत दाखला
७	वारसाची जात	**इतर मागास वर्ग (आग्री)**	जातीचा दाखला आहे
८	सफाई कामगारांचा मृत्यु / सेवानिवृत्त/ स्वेच्छा निवृत्ती /रुग्णता सेवा निवृत्ती झाला असल्यास पात्र वारसाचे संम्मती पत्र	कुटूंबातील इतर सदस्यांचे संमतीपत्र प्राप्त आहे.	कुटूंबातील एकूण व्यक्ती - ३
९	वारसास पात्र असणारी व्यक्ती त्याच कुटुंबात राहत असल्या बाबत पुरावा	रेशन कार्ड क्रमांक NO.	त्याच कुटुंबात राहत असल्याबाबत रेशकार्ड जोडले आहे. SE.no.६९६९७० रेशन कार्ड
१०	अर्जदाराशी नाते किंवा सांभाळ करणा-या व्यक्तीचे नाव	मुलगा	**सेवेसाठी पात्र**
११	प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे काय	होय	प्रतिज्ञापत्र सोबत जोडले आहे.
१२	जात पडताळणी प्रमाणपत्र आहे काय		शासन निर्णय दि. ११/०३/२०२४ नुसार शासन निर्णय दि. २४/०२/२०२३ मधिल अनु क्र. ८.४ नुसार नियुक्ती देण्यापूर्वी जात जातवैद्यता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याची अट वगळण्यात आलेली आहे.
१३	लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र		सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुध्दीपत्रक दि.११ मार्च,२०२४ नुसार लहान कुटूंबाचे प्रमाणत्र प्राप्त करुन घेण्याची अट वगळण्यात आलेली आहे.
१४	वारस कोणत्या पदासाठी पात्र होऊ शकेल.	सफाई कामगार	

१५	शिफारस	वारस श्री. अंकुश चंद्रशेखर पाटील हक्काने महानगर पालिका सेवेत लिपिक-टंकलेखक या पदासाठी पात्र आहे.	संबंधित सफाई कामगारांच्या वारसाकडे विहीत वेगमर्यादेचे टंकलेखन (पदाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार) MS-CIT अर्हता प्रमाणपत्र नसल्यास, असे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी त्यास दिनांक २०.०५.२०१५ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार दोन वर्षापर्यंत मुदत देण्यात यावी.

शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदी खालीलप्रमाणे:-

६. **सफाई कामगारांची व्याख्या** :- लाड समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, घाणीशी संबंधीत उदा. शौचालय स्वच्छता, घाणीशी संबंधीत मलनि:सारण व्यवस्था, नाली-गटारे, ड्रेनेज तसेच रुग्णालय व शव विच्छेदन गृहातील घाणीशी संबंधीत ठिकाणी सफाईचे काम करणाऱ्या खालील व्यक्ती-

१६. अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्ग.

१७. **सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार**.

१८. पूर्वी ज्या सफाई कामगारांनी डोक्यावरुन मैला वाहून नेण्याचे काम केले आहे. अशा सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नोकरीमध्ये प्राधान्य देण्यात यावे.

२. **सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणारे सर्व सफाई कामगार.**

२. **सफाई कामगारांकरीता वारसाहक्काची तरतूद**:- शासकीय/निमशासकीय/**महानगरपालिका**/ नगरपालिका/नगरपरिषदा/कटकमंडळे (कंटेनमेंट बोर्ड) राज्य शासनाची महामंडळे / राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था/ Parastatal संस्था/ अनुदानित संस्था शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय महाविद्यालये इत्यादी आस्थापनेवरील उपरोक्त (१) येथे नमूद व्याख्येनूसार सफाई कामगारांना त्यांच्या **सेवानिवृत्तीनंतर**, मृत्यूनंतर, स्वेच्छा निवृत्तीनंतर किंवा त्यांना वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर सफाई कामगाराचे आर्थिक नुकसान होऊ नये व त्याचे कुटूंब बेघर होऊ नयेआणि त्यास सामाजिक संरक्षण प्राप्त होण्याच्या दृष्टीने, लाड समितीच्या शिफारशीनूसार संबंधित सफाई कामगाराच्या जागी त्याच्या वारसाची नियमानूसार वारसा हक्काने नियुक्ती करण्याची कार्यवाही करावी.

३. **वारसा हक्काने पात्र ठरणारे सफाई कामगाराचे वारस :-**

३.१ पती/पत्नी

३.२ **मुलगा** / मुलगी

३.३ सून /जावई

३.४ विधवा मुलगी / बहिण/घटस्फोटीत मुलगी/बहिण/परित्यक्त्या मुलगी/बहिण/अविवाहित मुलगी अविवाहित बहिण.

३.५ सफाई कर्मचारी अविवाहीत असल्यास त्यांचा सख्खा भाऊ/सख्खी बहीण

३.६ नात/नातू

३.७ वरील पैकी कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सादर वारसापैकी कोणीही सफाईचे काम करण्यास तयार नसल्यास सफाई कामगाराचा तहहयात सांभाळ करण्याची लेखी शपथपत्राव्दारे हमी देणारी संबंधित नामनिर्देशित व्यक्ती असे नमूद आहे.

७. सफाई कामगाराच्या वारसास शैक्षणिक अर्हतेनुसार नियुक्ती:-

७.१ शासकीय/निगशासकीय/महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषदा/कटकमंडळे (कंटेनमेंट वोर्ड) राज्य शासनाची महामंडळे / राज्य शासनाच्या स्वायत्त संस्था/ Parastatal संस्था / अनुदानित संस्था शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, पशुवैद्यकीय महाविद्यालये इत्यादी आस्थापनेच्या सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी त्यांच्याकडील ज्येष्ठता यादीतील सफाई कामगाराच्या वारसास त्याची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्याआधारे त्यांची नेमणूक वर्ग-४ किंवा वर्ग-३ मध्ये करावी.

७.२ नियुक्ती प्राधिकारी यांनी अशी कार्यवाही करताना संबंधित सफाई कामगाराचा वारस हा वर्ग-३ वा वर्ग-४ मधील कोणत्याही पदासाठी शैक्षणिक अर्हता प्राप्त करीत असल्यास त्याची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन त्यानुसार त्यास वर्ग-३ वा वर्ग-४ च्या पदावर नियुक्ती देण्याची कार्यवाही करावी. मात्र वर्ग ३ चे पद उपलब्ध असल्यास व संबंधित वारसाची इच्छा असल्यास त्याला प्राधान्याने वर्ग ३ च्या पदावर नियुक्ती दयावी.

७.३ एखाद्या सफाई कामगाराचा वारस हा वर्ग-३ तसेच वर्ग-४ च्या पदासाठी शैक्षणिक अर्हतेनुसार पात्र ठरत असेल आणि त्याने वर्ग-३ च्या पदासाठी इच्छुकता दर्शविली असेल, मात्र संबंधित कार्यालयात वर्ग-३ चे पद रिक्त नसेल तर संबंधित वारसास भविष्यात वर्ग-३ च्या रिक्त पदावर नियुक्ती मिळण्याच्या अधिन राहून वर्ग- ४ मधील रिक्त पदावर वारसा हक्काने नियुक्ती देण्यात यावी व तसे नियुक्ती आदेशात नमूद करावे.

७.४ सफाई कामगाराच्या वारसास त्याच्या शैक्षणिक अर्हतेनुसार लिपीक-टंकलेखक या वर्ग- ३ (गट-क) च्या पदावर नियुक्ती द्यावयाची झाल्यास आणि संबंधित सफाई कामगारांच्या वारसाकडे विहीत वेगमर्यादेचे टंकलेखन (पदाच्या शैक्षणिक अर्हतेनुसार) MS-CIT अर्हता प्रमाणपत्र नसल्यास, असे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी त्यास दिनांक २०.०५.२०१५ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार दोन वर्षापर्यंत मुदत देण्यात यावी. यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने वेळोवळी निर्गमित केलेले शासन निर्णय / परिपत्रके लागू राहतील असे नमूद आहे.

शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदी खालीलप्रमाणे:-

६.**सफाई कामगारांची व्याख्या** :- लाड समितीच्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने, घाणीशी संबंधीत उदा. **शौचालय स्वच्छता**, घाणीशी संबंधीत मलनि:सारण व्यवस्था, नाली-गटारे, ड्रेनेज तसेच रुग्णालय व शव विच्छेदन गृहातील घाणीशी **संबंधीत ठिकाणी सफाईचे काम करणाऱ्या व्यक्ती**-

श्री.चंद्रशेखर विनायक पाटील, सफाई कामगार यांनी प्रभाग समिती एच नवघर माणिकपूर येथे घाणीशी संबंधीत साफ-सफाईचे कामकाज केलेले आहे. श्री. अंकुश चंद्रशेखर पाटील यांचे शाळा सोडल्याच्या दाखल्यावरून त्यांचे वय ३० वर्ष असल्याबाबत समतजे. तसेच मा.प्रांत अधिकारी, भिवंडी यांचेकडील जातीच्या दाखल्यावर त्यांची जात इतर मागास वर्ग मधील आग्री या जाती प्रवर्गात मोडत असल्याचे समजते. तसेच त्यांचे शिक्षण बी. कॉम (पदवीधर) पास असल्याचे समजते.

सबब शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ मधील तरतूदीनुसार श्री.चंद्रशेखर विनायक पाटील यांच्या नामनिर्देशित वारस मुलगा श्री. अंकुश चंद्रशेखर पाटील यांनी धारण केलेली शैक्षणिक अर्हतेनुसार व इतर अटी शर्तीच्या अधिन राहून वारसाहक्काने महानगरपालिका सेवेत "लिपिक-टंकलेखक" या पदावर नियुक्ती देणेबाबतच्या करणेबाबतच्या प्रस्तावावर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

निर्णय/ठराव:- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचारी **श्री.चंद्रशेखर विनायक पाटील, सफाई कामगार** यांची **दिनांक ३१/०७/२०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत. शासन निर्णय क्र.सफाई-२०१८/प्र.क्र.४६/सआक, दि.२४ फेब्रुवारी, २०२३** मधील तरतुदीनुसार त्यांची नामनिर्देशित वारस मुलगा **श्री. अंकुश चंद्रशेखर पाटील** यांना वारसाहक्काने महानगरपालिका सेवेत "**लिपिक-टंकलेखक**" या पदावर अटी व शर्तीस अधिन राहून सामावून घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

मनोजकुमार सुर्यवंशी, (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

10/12

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (प.), जि.पालघर, पिन नं.४०१ ३०३
दुरध्वनी - ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,

ठराव क्र. ९६०८

विभाग :- सार्व. बांधकाम
दिनांक :- ३०/१२/ २०२५

संदर्भ (मागील इतिवृत्ताचा संदर्भ नमूद करावा) :-	
विभागः - सार्व. बांधकाम प्रभाग समिती (बी) नालासोपारा	
कामाचे नांव :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.३९ मध्ये जिवदानी अपा. ते क्रिष्णा जनरल स्टोर ठाकूर स्कूल पर्यंत सी सी रोड करणे.	
लेखाशिर्ष :- रस्ते बांधकाम	योजनेचे नाव :-
अंदाजपत्रकीय रक्कम:- रु. ११,३८,४८६/- तांत्रिक मान्यता रक्कम :- रु. ११,३८,४८६/- निविदा रक्कम :- रु. ११,३८,४८६/-	
प्रशासकीय मान्यता आदेश ठराव क्र. :- १३९८ दिनांक:- १६/१०/२०२५ प्रशासकीय मान्यतेची रक्कम :- रु. ११,३८,४८६/-	
तांत्रिक मान्यता क्र.:- प्र.शहर अभियंता पु.क्र. १९/११२ सन २०२५ - २६ दिनांक. १५/१०/२०२५	
ई निविदा सूचना प्रसिध्दी दिनांक:- २०/१०/२०२५ वृत्तपत्र निविदा प्रसिध्दी दिनांक :- १९/१०/२०२५ कालावधी — ०७ दिवस	
वृनपत्रांची नावे:- १) दै.सकाळ २) दै. पुढारी ३) दै. चौफेर संघर्ष ४) दै. खबरे आजतक ५) दै. नवभारत ६) दै. इंडियन एक्सप्रेस ७) दै. मिड डे	
ई निविदा प्रसिध्दी तारीख :- दि. २०/१०/२०२५ दु. ३.०० पासून ते दि. २७/१०/२०२५ वेळ दु.३.०१ पर्यंत	
ई निविदाद्वारे विहीत मुदतीत प्राप्त निविदा संख्या :- ०२	
प्रथम लिफाफा उघडण्याची दिनांक :- २८/१०/२०२५	
द्वितीय लिफाफा उघण्याची दिनांक :- १८/११/२०२५	
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- श्री. प्रदीप पाचंगे, प्र.शहर अभियंता	

प्राप्त दर

अ.क्र.	निविदाकार	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी असल्यास पर फॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल	एल १, एल २, एल ३ इत्यादी नुसार क्रम निश्चित करुन नोंदवावा	एल १ चा तपशिल
१	मे. विजय कंन्स्ट्रक्शन	(-)२५.०० % कमी दराने	FDR No.५१३५२०	एल १	मे. विजय कंन्स्ट्रक्शन
२	मे. शशिकांत राजहंस	(-)२.१७ % कमी दराने	--	एल २	

उपरोक्त निविदाधारकांनी निविदेत भरलेल्या दर **मे. विजय कंन्स्ट्रक्शन** यांच्या **अंदाजपत्रकापेक्षा (-) २५.००% कमी दराची निविदा ही कमी असून योग्य व वाजवी आहे.**
